| MHPU140010652021 | | | |
|---|---|---|---|
| | **दाखल तारीख** | : | **२८.०४.२०२१** |
| | **नोंदणी तारीख** | : | **०७.०५.२०२१** |
| | **निकाल दिनांक** | : | **०७.०३.२०२६** |
| | **कालावधी** | : | **वर्ष महिना दिवस**<br>**०४ १० ०७** |

**सत्र न्यायाधीश (न्यायालय क्र.४), बारामती, जि.पुणे यांचे न्यायालयात**

(न्यायाधीश– श्री. हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी)

**सत्र खटला क्र. ७६/२०२१** **निशाणी क्र. १८**

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I))**

| गु.र.क्र. ५१२/२०१९ फौजदारी प्रक्रिया संहिता, १८६० चे कलम ३७६(१), ३७६(२)(एन), ३७९ अन्वये<br>**पोलीस ठाणे – बारामती तालुका** | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र सरकारतर्फे बारामती तालुका पोलीस ठाणे, जि.पुणे. |
| **प्रतिनिधीत्व** | श्री. व्ही.व्ही. घनवट, अति.सरकारी अभियोक्ता, बारामती. |
| **आरोपी** | **सचिन खंडू जाधव**<br>वय : ३८ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा. हरीकृपानगर, माळीनगर,<br>अकलुज, ता.माळशिरस, जि.पुणे. |
| **प्रतिनिधीत्व** | श्री. एम.पी. काळे, वकील, आरोपीकरीता. |

**भाग 'ब'**
**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०३/०७/२०१५ ते २३/०५/२०१९ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ११/०६/२०१९ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २९/१०/२०२० |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | १३/०६/२०२३ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | ०६/०३/२०२६ |
| निकालाची आरक्षीत तारीख | -- |
| निकालाची तारीख | ०७/०३/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | -- |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडणल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन खंडू जाधव | ११.८.२०२० | १३.१०.२०२० | फौजदारी प्रक्रिया संहिता, १८६० चे कलम ३७६(१), ३७६(२) | दोषमुक्त केले. | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (एन), ३७९ अन्वये | | | |

**भाग 'क'**
**( फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii) )**
**सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

## अ. सरकारी साक्षीदार,

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १ | माधुरी सुभाष थोरात | तक्रारदार/फिर्यादी |

## ब. बचावाचे साक्षीदार,

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्ष्ज्ञीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्ष्ज्ञीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणंची यादी**

## अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | |
| -- | -- | -- |

ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | --- | --- |

ड. भौतिक वस्तु

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | --- | --- |

## न्यायनिर्णय

## (पारित दिनांक ०७ मार्च, २०२६)

१. आरोपी हा फौजदारी प्रक्रिया संहिता, १८६० चे कलम ३७६(१), ३७६(२)(एन), ३७९ अन्वये आरोपावरील संपरिक्षेस सामोरे जात आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन येणेप्रमाणे,**

२. पिडीता ही सुर्यनगरी, बारामती येथे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करुन आपली उपजिवीका करते. दि.१६.०६.२०१८ रोजी आरोपीची तिचेसोबत फोनवर ओळख झाली व त्यांचे फोनवरच प्रेमसंबंध जुळले. त्यानंतर आरोपीने पिडीतेला लग्नाचे अमिष दाखवून वेळोवेळी तिच्यासोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवले. त्यानंतर आरोपीने पिडीतेच्या घरातील कपाटातून रोख र.रु.१०,०००/– ची चोरी केली. सबब पिडीता हिने आरोपी विरुध्द सदर घटनेबाबत बारामती तालुका पोलिस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

३. उपरोक्त नमूद फिर्यादीवरुन बारामती तालुका पोलीस ठाणे यांनी अपराध क्र.५१२/२०१९ अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले, पिडीतेची वैदयकिय तपासणी करवून घेवून सदर वैद्यकिय तपासणीबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त केले. तपासाअंती आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने बारामती तालुका पोलिस ठाण्याचे ठाणे अंमलदार यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयामध्ये सादर केले. सदरचे दोषारोपपत्र संबंधित न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.४, बारामती यांनी या न्यायालयात वर्ग केले.

४. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द नि.क्र.६ अन्वये आरोप निश्चित केले व ते आरोपीस त्याच्या भाषेत समजावून सांगितले. आरोपीने गुन्हा नाकबुल केला व संपरीक्षेस समर्थता दर्शविली. साक्षीदाराच्या पुराव्यात आरोपीस त्याचे विरोधातील आरोपात गुंतविणारा कुठलाही पुरावा न आल्याने त्याचा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेचा जबाब निष्कासित करण्यात आला.

५. खालील मुद्दे या खटल्याच्या न्यायनिर्णयार्थ माझ्या समक्ष उपस्थित होतात. त्यांना मी खालीलप्रमाणे माझे निष्कर्ष नोंदवून त्याची कारणमिमांसा सादर करतो.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने पिडीतेवर बलात्कार किंवा वारंवार बलात्कार केला ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने पिडीतेच्या घरातील रक्कम रु.१०,०००/- चोरी केली ? | नाही. |
| ३. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिता –**

**६.** आरोपीवरील आरोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने केवळ १ साक्षीदार म्हणजेच पिडीता हिला नि.क्र.११ अन्वये तपासले. पिडीतेने आपल्या पुराव्यात अभियोगपक्षास सहकार्य न करता अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे कुठलीही घटना घडली नसल्याचे कथन केले. सबब विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदाराला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले मात्र त्यातही आरोपीस त्याचे विरोधातील आरोपात गुंतवणारा व अभियोगपक्षाच्या कथनास पुरक असा कुठलाही पुरावा आलेला नाही. प्रकरणातील महत्वाची साक्षीदार म्हणजे पिडीता हीने अभियोगपक्षास तिचे पुराव्यादरम्यान सहकार्य केलेले नसल्याने अभियोगपक्षाने इतर साक्षीदार तपासले नसल्याचे दिसून येते. सबब प्रस्तुत प्रकरणात आरोपीस त्याचे विरोधातील आरोपात गुंतवणारा व अभियोगपक्षाच्या कथनास पुरक असा कुठलाही पुरावा आलेला नसल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत आरोपीवरील आरोप सिध्द करण्यात अभियोगपक्ष सपशेल अपयशी ठरल्याचे माझे ठाम मत होते. सबब मुद्दा क्र.१ व २ यावर मी नकारार्थी निष्कर्ष नोदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ३ करिता –**

७. मुद्दा क्रमांक १ व २ यावर मी नकारार्थी निष्कर्ष नोंदविल्याने आरोपीस त्याच्या विरोधातील आरोपातून दोषमुक्त करणे क्रमप्राप्त होते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **सचिन खंडू जाधव** यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३७६(१), ३७६(२)(एन) व ३७९ च्या शिक्षापात्र अपराधातून दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचा जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७ (अ) च्या पुर्ततेसाठी रक्कम रु.२५,०००/– चे बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जातमुचलका सादर करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HETENDRA ANILKUMAR WANI
Date: 2026.03.09 13:19:42 +0530

(हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी)

दिनांक – ०७.०३.२०२६ अति. सत्र न्यायाधीश, बारामती.